MHSI07-000472-2025

निशाण क्र. ०७ वरील आदेश

अर्जदार देवता दिनकर खोबरेकर यांनी पोलिस स्टेशन, मालवण यांनी गुन्हा क्र. १५१/२०२५ मध्ये जप्त केलेला SAMSUNG Galaxy A16 5G 8 G 256kGB light Green 175 मोबाईल फोन सिमकार्डसहित सुपुर्तनाम्यावर मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार याने असे कथन केले आहे की, त्यांचे व आरोपीचे हॉटेल भाई भाई व भाई भाई फॅन्सी ड्रेसवाले या नावाचे दुकान आहे. सदर दुकानासाठी ऑनलाईन पेंमेंट साठी सदर मोबाईलचा वापर करत असते. सध्या मोबाईल ही अतिशय गरजेची वस्तु असून तिला कामाधंदयाकरीता सदर मोबाईलची सतत गरज भासते त्यामुळे तिला सदर मोबाईलची आवश्यकता आहे. अर्जदारने पुढे असे कथन केले आहे की, न्यायालय जे काही अटी शर्तीचे देईल त्याचे पालन करण्यास ती तयार आहे. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली केली आहे.

३. सदर अर्जावर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी नि. १० येथे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविलेला आहे. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असे कथन केले आहे की, जप्त मोबाईल हा अर्जदार यांच्या ताब्यात दिल्यास सदर केसवर परिणाम होणारा असल्याने सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती त्यांनी केली आहे.

४. अर्जदारा तर्फे विद्वान वकिल व सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तर्फे करण्यात आलेले युक्तिवाद ऐकले. अभिलेखाचे काळजीपुर्वक अवलोकन केले. अर्जदाराने नि.क्र. ०९ सोबत जप्त SAMSUNG Galaxy A16 5G 8 G 256kGB light Green 175 मोबाईल खरेदीच्या बिलाची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदर दस्ताऐवजावरुन असे दिसून येते की, अर्जदार ही सदर मोबाईलची मालक आहे.

५. सदर जप्त मुद्देमालावर अर्जदार व्यतिरिक्त अन्य कोणीही आपला हक्क सांगितलेला नाही. जप्त मुद्देमाल मोबाईल हा पोलीस स्टेशनमध्ये राहिल्यास अर्जदार यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत माझ्या मते अर्जदार प्रस्तुत प्रकरणातील जप्त मोबाईलचा तात्पुरता ताबा मिळण्यास पात्र आहे.

६. या ठिकाणी, मी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सुंदरभाई अंबालाल देसाई विरुध्द गुजरात राज्य***, AIR 2003 SC 638*** या प्रकरणात जारी केलेल्या व्यापक मार्गदर्शक तत्वाचा संदर्भ घेवू इच्छितो, म्हणजेच (१) वस्तूचा मालक ती वस्तू वापराविना पडून राहिल्यामुळे किंवा तिचा गैरवापर झाल्यामुळे नुकसान सोसणार नाही (२) न्यायालय किंवा पोलीसांना ती वस्तू सुरक्षित ताब्यात ठेवण्याची आवश्यकता भासणार नाही (३) वस्तूचा ताबा देण्यापुर्वी योग्य पंचनामा तयार केला गेल्यास, खटल्याच्या सुनावणीदरम्यान न्यायालयात ती वस्तू सादर करण्याऐवजी तो पंचनामा पुराव्यासाठी वापरला जावू शकतो, आवश्यकता असल्यास, मालमत्तेचे स्वरुप तपशीलवार वर्णन करुन पुरावा देखील नोंदवला जावू शकतो.

७. म्हणून उपरोक्त प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार हे स्पष्ट आहे की, तपशीलवार पंचनामा आणि छायाचित्रे पुराव्यासाठी वापरली जाऊ शकतात आणि ती वस्तू न्यायालय किंवा पोलीस ठाण्यात ताब्यात ठेवण्याची आवश्यकता नाही. अशा परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार, सदर मोबाईल फोन पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास कोणताही उद्देश साध्य होणार नाही. शिवाय, अर्जदाराला ती दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. सबब, अर्जदार ही  सदर मोबाईल फोनचा अंतरिम ताबा मिळणेस पात्र आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १. | अर्ज नि.क्र.०७ मंजूर करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| २. | तपासिक अंमलदार, मालवण पोलीस ठाणे यांना असे निर्देश देण्यात येतो की, त्यांनी मालवण पोलीस ठाणे गुन्हा क्र. १५१/२०२५ मध्ये जप्त केलेला SAMSUNG Galaxy A16 5G 8 G 256kGB light Green 175 मोबाईल फोन सिमकार्डसहित हा अर्जदार देवता दिनकर खोबरेकर, त्यांनी रक्कम रुपये २२,०००/- चा क्षतीपुर्ती बंधपत्र (indemnity bond) सादर केल्यानंतर खालील अटी शर्तीवर सुपूर्द करावी,<br><br>(अ) अर्जदाराने सदर मोबाईल फोन न्यायालयाच्या निर्देशानुसार जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा सादर करावा.<br><br>(ब) अर्जदाराने सदर मोबाईलचा देखावा, रचना, रंग आणि स्वरुप यामध्ये कोणताही बदल करु नये<br>(क) अर्जदाराने सदर मोबाईल फोन खटल्याच्या अंतिम निकालापावेतो कोणत्याही हस्तांतरण पध्दतीव्दारे तिसऱ्या व्यक्तीला हस्तांतरीत करु नये. |
| ३. | तपासिक अंमलदार यांना असे निर्देश देण्यात येतो की, त्यांनी सदर मोबाईल फोनची छायाचित्रे घ्यावीत, त्यावर अर्जदाराची साक्षांकित किंवा प्रतिस्वाक्षरी घेवून तिचा सविस्तर पंचनामा तयार करावा. तसेच सदरचा पंचनामा न्यायालयात सादर करावा. |
| ४. | फोटोचा खर्च अर्जदार याने करावा. |
| ५. | सदर आदेशाची समज त्वरीत तपासिक अंमलदार यांना देण्यात यावी. |
| | (खुल्या न्यायालयात श्रुतलेखन करुन घोषीत करण्यात आले.) |

सही/-
एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग -१ मालवण.

दिनांकः ०४/०२/२०२६